पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६५**

(सभावृत्तांत)

दिनांक – ३०/०५/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ३०/०५/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.अमित राजेंद्र गावडे
३. मा.गावडे राजेंद्र तानाजी
४. मा.आंगोळकर सागर सुनिल
५. मा.लोंढे नम्रता योगेश
६. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
७. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
८. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
९. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१०. मा.बारणे अर्चना तानाजी
११. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.आष्टीकर - अतिरिक्त आयुक्त (१), मा.गावडे - अतिरिक्त आयुक्त (२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे – अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण - सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोराटे, मा.राऊत, मा.चितळे, सहाय्यक आयुक्त, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार, मा.पाटील – प्रचार्य, औ.प्र.कें., मा.निकम, मा.सवणे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे, मा.घुबे, मा.सुपेकर, मा.पवार, मा.विशाल कांबळे, मा.पोरेड्डी - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप - कामगार कल्याण अधिकारी, मा.दांगट, मा.मुथा – प्रशा.अधिकारी, मा.मुंढे – प्र.प्रशासन अधिकारी, (शिक्षण मंडळ), मा.झनकर – लेखाधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.२८) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे सत्कार समारंभाबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३०) २०१८-१९ या शैक्षणिक वर्षा करिता घड्याळी तासीका बेसीसवर शिक्षकांची नेमणूक करणेस व त्यांना शासन निर्णयानुसार मानधन अदा करणेबाबत.

विषय क्र.३१) पिंपरी चिंचवड मनपाच्या ह प्रभागातील जलनि:सारण नलिकांची यांत्रिकी पध्दतीने वार्षिक साफसफाई करणे व चोकअप काढणे.

विषय क्र.३२) दि.२४/५/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रभाग क्र.२५ मधील विविध विकास कामांचा भुमिपुजन समारंभ या कार्यक्रमाची चौकशी करून प्रशासकिय कारवाई करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) प्रायोगिक तत्वावर व्हर्टिकल गार्डन विकसीत करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

---------

दिनांक २३/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६४) चा सभावृत्तांत कायम करणेबाबत पुढील सभेच्या वेळी विचार करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक -२७११ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – माहिती व तंत्रज्ञान
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मातंवि/६/कावि/१७२/२०१८, दि.०७/०५/२०१८

विषय – NIC यांचेकडील ई-निविदा संगणक प्रणालीचा वापर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये करणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार दि.१३/०६/२०१८ च्या सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१२ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/शअ/तां/४/९२/२०१८, दि.०९/०५/२०१८

विषय – महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना रस्ता खोदाई करणेस परवानगी देणेबाबत.

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१३ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/उद्यान/कावि/२३२/२०१८, दि.१७/०५/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९२/०१/२०१७-१८ मधील काम क्र.१ अन्वये, प्रभाग क्र.३१ मॅगझीन चौक उद्यान विकसित करणेकामी मे.डी.जे एंटरप्रायजेस निवीदा र.रु.३६,८६,३१४/- (अक्षरी र.रू. छत्तीस लाख, शहाऐंशी हजार तीनशे चौदा फक्त) पेक्षा २६.२७% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२७,१७,९१९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१४ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – स्व.म.अ.क.

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्वमअक/३/कावि/१३६/२०१८, दि.१८/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

मे.International Association of Lions Clubs, Lion club Of Mumbai Image संस्थेमार्फत ई-टॉयलेट बसविणेस परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ३/४/२०१८ रोजी महानगरपालिकेस सादर केला आहे. सदर संस्था स्वत: सीएसआर फंडाव्दारे निधी उभारते. सदर संस्थेने महानगरपालिका हद्दीत ई-टॉयलेट उभारुन टॉयलेटच्या देखभाल दुरुस्तीसाठी त्यावर व्यावसायिक जाहिराती करणेकामी शुल्कामध्ये सवलतीसह परवानगी मागितली आहे. अशा प्रकारच्या स्वच्छतागृहांचे उभारणीसाठी महानगरपालिका परिसरात संबधित खाजगी

संस्थेस जागा उपलब्ध करुन देणे, स्वच्छतेकामी लागणारे पाणी, वीज व सांडपाण्यासाठी व्यवस्था महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावयाचे धोरण यापूर्वी महानगरपालिका सभा ठराव क्रमांक ४८ दिनांक २०/६/२०१७ अन्वये मंजूर करणेत आले आहे. सदरचे स्वच्छतागृह देखभाल दुरुस्तीसह स्वच्छतेकामी पाणी बिल, वीज बिल, कर्मचारी यांचेकरिता होणा-या खर्चासाठी संस्थेने जाहिरातीसाठी लायसेंस फी मध्ये सवलत देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार परवाना विभागाचा अभिप्राय घेतला असता जागा भाडे माफ करणेस सक्षम समितीची मंजुरी मिळालेवर संबधित संस्थेने आवश्यक कागदपत्र सादर केलेवर त्यांचेकडून जाहिरात कर, परवाना फी, व प्रक्रिया शुल्क आकारणी करुन जाहिरात परवाना देणेबाबतचा अभिप्राय दिलेला आहे. जाहिरातीच्या बोर्डचा आकार १० फुट लांबी व १० फूट उंची असा राहणार असुन या आकाराचे दोन पॅनेल असणार आहे. सदरची संस्था ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात महानगरपालिकेच्या गरजेनुसार ई टॉयलेट बसविणार असुन त्यामध्ये १ शौचालय व युरीनसह पुरुष व १ शौचालय स्त्रियांसाठी असणार आहे. त्यासाठी संस्था ही १५ वर्षाचा सामंजस्य करार पुढील ५ ते १० वर्षाचे नुतनीकरण सह महानगरपालिकेसोबत करणेस तयार आहे. सदर जागेवर शौचालयाचा वापर करणेसाठी नागरिकांकडून संस्थेस कोणतेही शुल्क वसुल करता येणार नाही. जाहिरात परवाना मिळणेकरिता १) जाहिरात कर २) परवाना फी ३) प्रक्रिया शुल्क नियमानुसार संबंधित संस्थेस भरणेस बंधनकारक असणार आहे. सदरचे स्वच्छतागृहासाठी संस्थेस मनपामार्फत निशुल्क पाणीपुरवठा व जागा उपलब्ध करुन देणे ही बाब धोरणात्मक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१५ विषय क्रमांक - ०५

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/फ-मुख्य/२७६/२०१८, दि.१८/०५/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73-23-2017-2018 अन्वये प्रभाग क्र.१२ मधील से.क्र.२२ ओटा स्किमच्या विकसीत झालेल्या इमारतीच्या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे व देखभालीची कामे करणेकामी राज अर्थमुव्हर्स ऍन्ड ट्रान्स्पोर्ट नि.र.रू.46,21,580/- (अक्षरी रक्कम रुपये शेहचाळीस लाख एकवीस हजार पाचशे ऐंशी फक्त) पेक्षा 32.99% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.30,96,921/- पर्यंत काम करून घेणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१६ विषय क्रमांक - ०६

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – अ क्षेत्रिय स्थापत्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.अक्षेका/स्था/कावि/५७७/२०१८, दि.१५/०५/२०१८

विषय – पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील जुना जी बी हॉलवर स्लॅब टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे याकामासाठी (Architect) व (PMC) ची नेमणुक करणेबाबत.

विषय क्र.६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१७ विषय क्रमांक - ०७

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - स्थापत्य मुख्यालय

सूचक – मा.नम्रदा लोंढे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/अ-मुख्य/७३९/२०१८, दि.०५/०५/२०१८

विषय – ब प्रभाग कार्यालयासाठी नविन प्रशासकीय इमारत बांधणे.

विषय क्र.७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

निर्णय – सदर कामासाठी फेरनिविदा काढणेत यावी.

----------

ठराव क्रमांक -२७१८ विषय क्रमांक - ०८

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - स्थापत्य उद्यान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.स्था/उद्यान/कावि/२३४/२०१८, दि.१७/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२३/०१/२०१७-१८ मधील काम क्र.०१ अन्वये, पिंपरी प्र. क्र. ४४ मधील हेमू कलानी उद्यानात शहीद हेमू कलानी यांचा पुतळा उभारणेकामी मे.हर्ष एंटरप्रायजेस नि.र.रु.२४,९०,०००/- (अक्षरी र.रु. चोवीस लाख, नव्वद हजार फक्त) पेक्षा ०४.००% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२५,८९,६००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७१९ विषय क्रमांक - ०९

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/०४/कावि/३६८/२०१८, दि.१५/५/२०१८

मा.सहा.आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे -

आरोग्य विभागास पायरेथ्रम एक्स 2 टक्के आय एस आय मार्क खरेदी करणेकामी ई नि.सु.क्र.01/2018-19 अन्वये प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, ठाणे यांचे दर प्रती लिटर र.रु.2280/- याप्रमाणे 775 लिटरसाठी एकुण र.रु.17,67,000/- (अक्षरी र.रु. सतरा लाख सद्दुष्ट हजार फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२० विषय क्रमांक - १०

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – म.सा.भां.(वैद्य)

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/१२४/२०१८, दि.१६/०५/२०१८

विषय – वाय.सी.एम.एच येथे रूग्णांना हेल्थ कार्ड उपलब्ध करून देणेकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.१० चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२१ विषय क्रमांक - ११

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - जलनि:सारण, ग क्षेत्रिय

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.गक्षे/जनि/ग१/१९३/२०१८, दि.१७/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पिंपरी चिंचवड मनपाचे “ग” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेचे काम मे.बी.व्ही.जी इंडिया यांचे काम ५.५०% कमी दराने चालू आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.१५३२ दि.०७/१२/२०१७ नुसार मे.बी.व्ही.जी इंडिया यांना ५.५०% कमी दराने ३ महिने करीता र.रु.२३,३७,२४५/- काम करून घेण्यास व खर्चास मान्यता दिलेली आहे. नवीन निविदेसाठी मे.विशाल सिव्हील कॉन्ट्रॅक्टर यांनी २% कमी दराने निविदा सादर केलेली आहे. बी.व्ही.जी.इंडिया व विशाल सिव्हील कॉन्ट्रॅक्टर यांच्या दराची तुलना केली असता मे.बी.व्ही.जी.इंडिया यांचे दर कमी आहे.

३ महिना कालावधीसाठी र.रु.२४,७३,२७५/- यानुसार ५.५०% कमी दराने २३,३७,२४५/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.२३८८ दि.२८/०२/२०१८ नुसार सदर कामास ६ महिन्यांची मुदतवाढ व सदर कामासाठी ड आणि अ प्रभागाप्रमाणे बील अदा करणेस सदस्य प्रस्तावाद्वारे मान्यता दिलेली आहे. मे.बी.व्ही.जी.इंडिया यांचेकडून 'ग' क्षेत्रीय जलनिःसारण विभागाकडे करीत असलेल्या कामास ३ महिने मुदतवाढ दिल्यास र.रु.२३,३७,२४५/- इतका खर्च वाढणार आहे तरी वाढीव खर्च रक्कम रु.२३,३७,२४५/- सह एकूण र.रु.४६,७४,४९०/- (अक्षरी र.रु.शेहेचाळीस लाख चौ-याहत्तर हजार चारशे नव्वद फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेची मा. आयुक्त यांची मागणी असली तरी र.रु.२३,३७,२४५/- (अक्षरी र.रू. तेवीस लाख सदोतीस हजार दोनशे पंचेचाळीस फक्त) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२२ विषय क्रमांक - १२

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – आरोग्य मुख्यालय

सूचक – मा.लोंढे नम्रता अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ– मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे क्र.आ.मु.का./४/कावि/३५१/२०१८, दि.१७/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस JnNURM अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन यासाठी शासनाकडील मंजूर निधीमधुन यांत्रिक पद्धतीने रस्ते सफाईकामी मनपा मालकीची VT 650 क्षमतेची ४ तसेच VT 500 क्षमतेची-४ असे एकूण ८ रोडस्विपर वाहने खरेदी केली आहेत. तसेच ठेकेदार मालकीचे २ असे एकूण १० रोडस्विपर वाहनांव्दारे मनपा हद्दीतील रस्त्यांची (यांत्रिक पध्दतीने) रोडस्विपर वाहनांव्दारे दैनंदिन साफसफाई करणेकामी निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ प्रसिध्द केली असता सदर निविदेसाठी खालीलप्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झाले असुन सदर ठेकेदारांना दि.१/१२/२०१५ ते दि.३०/११/२०१७ पर्यंत २ वर्ष कालावधीसाठी कामाचे आदेश दिले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारक/ ठेकेदाराचे नाव | वाहनांचा तपशिल | अंदाजपत्रकीय दर र.रु.(प्रति कि.मी प्रति दिन) | प्राप्त लघुत्तम दर र.रु.(प्रति कि.मी प्रति दिन) |
|---|---|---|---|---|
| १. | मे.डी.एम.एंटरप्रायझेस | मनपाची VT – 500-४ | ३२७/- | २१९/- |
| २. | मे.बी.व्ही.जी. इंडीया लि. | मनपाची VT – 650 -४ | ४२३/- | २७१/- |
| ३. | मे.बी.व्ही.जी. इंडीया लि. | ठेकेदाराची VT – 500 -२ | ५०३/- | २९८.५० |
| ४. | मे.डी.एम.एंटरप्रायझेस | मनपाची VT – 500- २ वाहनांकडून मुंबई - पुणे रस्ता साफसफाई | ३२७/- | २१९/- |

सदर कामाची मुदत संपली असुन मनपाचे ६ चे ८ क्षेत्रीय कार्यालय झाल्याने त्यानुसार नविन निविदेसाठीची क्षेत्रीय कार्यालयनिहाय रोडस्विपर वाहनांची आवश्यक संख्या व तसेच रुटचार्ट इत्यादी आवश्यक माहिती मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रीया पुर्ण होवुन प्रत्यक्ष काम सुरु होण्यासाठी काही कालावधी जाणार आहे. तरी उपरोक्त नमुद केलेल्या

दरानुसार सदर संस्थांकडून दि.१/१२/२०१७ ते ५ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी प्रथम होईल त्या कालावधीसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.२३५७ दिनांक २८/२/२०१८ अन्वये मान्यता दिली आहे. सदर कामाची मुदत दि.३०/४/२०१८ रोजी संपली असल्याने उपरोक्त नमुद केलेल्या दरानुसार सदर संस्थांकडून दि.१/५/२०१८ ते दि.३१/८/२०१८ अखेर ४ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास (४ महिने कालावधीसाठीचा अंदाजित खर्च र.रु.१,४०,००,०००/-) (अक्षरी र.रू.एक कोटी चाळीस लाख फक्त) तसेच त्यानुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२३ विषय क्रमांक – १३
दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ – मा.सहा. आयुक्त (भांडार) यांचे जा.क्र.मभां/०४/कावि/३८५/२०१८, दि.१९/०५/२०१८

मा.सहा. आयुक्त (भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाचे विविध विभागास आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीकामी ई-निविदा सुचना क्र.53/2017-18 चे मंजुर दरानुसार मे.एम.पी.एल.इंजिनिअरींग, चिंचवड यांचे बाब क्र.01, 02, 04, 06, 07, 08, 09 व 10 एकुण बाबी 08 साठी एकुण र.रु.11,26,019/-, 02. मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कंन्झुमर स्टोअर, पिंपरी यांचे बाब क्र.03 साठी एकुण र.रु.1,49,695/- व 03. मे.स्वरा एंटरप्रायजेस, चिंचवड यांचे बाब क्र.05 साठी एकुण र.रु.70,800/- असे एकुण 10 बाबी साठी एकुण र.रु.13,46,514/- (अक्षरी र.रु. तेरा लाख शेहेचाळीस हजार पाचशे चौदा फक्त) इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर विहीत नमुन्यात करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२४ विषय क्रमांक – १४
दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.प्रज्ञा खानोलकर
संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/२७५/१८, दि.१९/०५/२०१८

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते १७) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भागवाढ कलम लागू असल्यास, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२७२५ विषय क्रमांक – १५

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – ह क्षेत्रिय YCMH

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.वि/हक्षे/वायसीएमएच/१२५/२०१८, दि.२१/०५/२०१८

विषय – १ जुन २०१८ ते ३१ मे २०२१ (३ वर्ष) ह्या कालावधिकरीता वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील UPS Sysyem (4 UPS) ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणेबाबत.

विषय क्र.१५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२६ विषय क्रमांक – १६

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग– वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सूचक – मा.यशोदा बोईनवाड अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जा.क्र.काशा/भां/कावि/१२७/२०१८, दि.२३/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपाच्या मालकीची जुनी/निकामी एकूण ६९ वाहनाचा लिलाव करणेकरीता लिलावदाराची नेमणूक करण्यासाठी ३ वेळा केलेल्या ई-निविदा कार्यवाहीत अंतिमत: एक निविदा प्राप्त झालेने सदर निविदा दि.१३/०३/२०१८ रोजी सक्षम मान्यतेने उघडण्यात आली असता त्यामध्ये मे.रिलायन्स ऑक्शनर्स यांचे आर.टी.ओ.ने विहीत केलेल्या वाहनांच्या लिलावाच्या गोपनिय किंमतीनुसार प्रत्यक्ष लिलावात ठरणा-या वाहनांच्या विक्रीच्या किंमतीवर २% इतका लिलाव कमिशन दर प्राप्त झाला आहे. सदर दर स्विकृतीस व त्यानुसार एक वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस तसेच त्या दराने लिलावदाराचे येणारे कमिशन अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२७ विषय क्रमांक – १७

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.प्रज्ञा खानोलकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/६/कावि/२२३/२०१८, दि.२४/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध एसी,वॉटर कुलर्स आणि फॅन्स साहित्य खरेदीकामी ई निविदा सुचना क्र.38/1/2017-18 अन्वये, ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. यानुसार सदर निविदे करीता एकुण सहा निविदाकार प्राप्त झाले. निविदेतील प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.एनर्जी टेक सिस्टीम यांचे प्राप्त लघुत्तम बाब क्र.1 याप्रमाणे एकुण 01 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.14,70,000/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.02% ने कमी असल्याने व मे.धूपर ब्रदर्स ट्रेडींग प्रा.लि. यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र. 2 व 3 याप्रमाणे एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.10,13,750/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.73% ने कमी

असल्याने तसेच मे.यश इलेक्ट्रोलाईन यांचे प्राप्त लघुत्तम दर बाब क्र.4 व 5 याप्रमाणे एकुण 02 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.1,03,875/- हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.26% ने कमी असल्याने याप्रमाणे सदर एकुण लघुत्तम दर बाब क्र.1,2,3,4,5 या सर्व साहित्यांचे प्राप्त लघुत्तम दर एकुण र.रू.25,87,625/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख, सत्याऐंशी हजार, सहाशे पंचवीस फक्त) हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 10.94% ने कमी असल्याने स्विकृत करून त्यांचेबरोबर करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२८ विषय क्रमांक – १८

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – मुख्य लेखा परिक्षण

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ – मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/६/कावि/९७/२०१८, दि.२१/०५/२०१८

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केले प्रमाणे -

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील माहे एप्रिल २०१८ अखेर संपणारा मासिक गोषवारा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९७/२०१८ दि.२१.०५.२०१८ अन्वये पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७२९ विषय क्रमांक – १९

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/४/कावि/२६८/२०१८, दि.२५/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

दि.२६ जानेवारी २०१८ रोजी देशातील सर्वात उंच राष्ट्रध्वजाचे भक्ती - शक्ती चौक निगडी येथे प्रजासत्ताकदिनी उदघाटन, ध्वजारोहन कार्यक्रमासंदर्भात १४४० विदयार्थ्यांना खाऊ म्हणून बिस्कीटांचा थेट पध्दीतीने खरेदी करणेकामी मे.श्री.भक्ती एंटरप्रायजेस, चिखली प्राधिकरण पुणे १९ यांचेकडून एकुण १४४० विद्यार्थ्यांना ब्रिटानिया ६६ ग्रॅम वजनाचे गुड डे रिच बटर कुकीज बिस्कीटांचा ०१ पुडा प्रति नग ९.०९ दर याप्रमाणे १४४० पुडयांचे एकुण र.रू.१३,१०१/- व मे.साई सेवा केटरर्स, चिंचवड, पुणे १९ यांचेकडून १४०० विदयार्थ्यांना पाणी बाटली थेट पध्दतीने खरेदी करणेकामी प्रति पाणी बाटली १०/- दर याप्रमाणे १४०० बाटल्यांचे र.रु.१४,०००/- असे एकूण र.रु.२७,१०१/-(अक्षरी र.रू. सत्तावीस हजार एकशे एक फक्त) अदा करणेत आलेल्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३०    विषय क्रमांक – २०
दिनांक – ३०/०५/२०१८    विभाग - माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.राजेंद्र गावडे    अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/०३/कावि/१३४/२०१८, दि.२५/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिंपरी चिचंवड मनपाच्या माध्यमिक विद्यालयासांठी सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात इयत्ता 5 ते 8 वी व 9 ते 10 वी च्या मराठी, इग्रंजी, ऊर्दु माध्यमासाठी एकुण ३९९४८ क्रमिक पुस्तके थेट पध्दतीने खरेदीकामी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे यांना आगाऊ रक्कम रू.21,80,436/- किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३१    विषय क्रमांक – २१
दिनांक – ३०/०५/२०१८    विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.विकास डोळस    अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/४/कावि/२६९/२०१८, दि.२५/०५/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत असलेल्या १८ माध्यमिक विद्यालयातील तसेच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (मुलांचे), मोरवाडी, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मुलींच्या, कासारवाडी मधील विद्यार्थ्यांना २६ जानेवारी २०१८ प्रजासत्ताक दिना निमित्त विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून ब्रिटानिया गुड डे रिच बटर ६६ ग्रॅम बिस्कीटे पुरवठा करणेकामी नामांकीत कपंनी ब्रिटानिया इंडस्ट्रीज लि मि. बेंगलोर या उत्पादीत कंपनीचे पिंपरी चिंचवड मधील अधिकृत विक्रेते मे.भक्ती एंटरप्रायजेस, शिवतेजनगर, चिंचवड स्टेशन, पुणे-१९ यांचे कडून करारनामा न करता, सरळ थेट पध्दतीने खरेदी केले असल्याने प्रति नग ९.०९ दर या प्रमाणे एकुण ९,१०८ विद्यार्थ्यांचे एकूण र.रू.८२,७९२/- (अक्षरी र.रू.ब्याऐंशी हजार सातशे ब्याण्णव फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३२    विषय क्रमांक – २२
दिनांक – ३०/०५/२०१८    विभाग – लेखा विभाग
सूचक – मा.राजेंद्र गावडे    अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/१/कावि/१३३६/२०१८, दि.२४/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार महानगरपालिकेचे सन २०१६-१७ या वर्षातील प्रत्यक्ष जमा खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आले आहेत. सदर वार्षिक लेख्यांनुसार प्रत्यक्ष जमा खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -२७३३ विषय क्रमांक – २३

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – क्रिडा विबाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/१२६/२०१८, दि.१०/०४/२०१८

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्रमांक ०४ दिनांक २५/०५/२०१८ अन्वये आगामी जिल्हास्तर शालेय हॉकी स्पर्धा २०१८-१९ अनुषंगाने २५० विद्यार्थी खेळाडूंचे मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडीयम नेहरूनगर, पिंपरी १८ येथे दि.१५/०४/२०१८ ते १४/०५/२०१८ या काळात उन्हाळी हॉकी प्रशिक्षण शिबीर २०१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,५४,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख चौप्पन्न हजार फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदरचा खर्च, क्रीडा निधी, क्रीडा प्रशिक्षण शिबीर या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३४ विषय क्रमांक – २४

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – क्रीडा विभाग

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/१४७/२०१८, दि.०३/०५/२०१८

२) मा. क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्र.५ दि.२५/०५/२०१८

विषय – उन्हाळी प्रशिक्षण शिबीर २०१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.२४ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३५ विषय क्रमांक – २५

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - विद्युत मुख्य

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे जा.क्र.विमुका/५/कावि/२०४/२०१८, दि.२५/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील निविदा नो.क्र.36-2017/18 मधील अ.क्र.1 अन्वये प्रभाग क्र.27 मध्ये एल.ई.डी. दिवे बसविणेकामी मे.मनुश्री इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.29,95,180/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख पंच्च्याण्णव हजार एकशे ऐंशी फक्त) पेक्षा 16.60% कमी, या दराने ठेकेदाराकडुन काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीस अधिन राहुन ठेकेदाराबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३६ विषय क्रमांक – २६

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – स्थापत्य ब मुख्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२-ब/३६०/२०१८, दि.२४/०५/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.102/1/2017-18 अन्वये क्रांतीवीर चाफेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे भाग १ कामी मे.यशक असोसिएट्स नि.र.रू.48,96,009/- (अक्षरी रक्कम अठ्ठेचाळीस लाख शहाण्णव हजार नऊ फक्त) पेक्षा 11.88% पेक्षा कमी या दराने र.रू.43,14,363/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७३७ विषय क्रमांक – २७

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग - स्थापत्य ब मुख्य

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.यशोदा बोईनवाड

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/२-ब/३६१/२०१८, दि.२४/०५/२०१८

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.103/7/2017-18 अन्वये प्रभाग क्र.१८ मध्ये ताब्यात येणारे आरक्षणे विकसीत करणेकामी मे.एस.व्ही. सातपुते डेव्हलपर्स अन्ड बिल्डर्स नि.र.रू.27,93,670/- (अक्षरी रक्कम सत्ताविस लाख त्र्यान्नव हजार सहाशे सत्तर फक्त) पेक्षा 27.27% कमी या दराने र.रू.20,31,836/- पर्यंत काम करून घेणेस आणि त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २७३८ विषय क्रमांक – २८

दिनांक – ३०/०५/२०१८

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.अर्चना बारणे

संदर्भ – मा.सागर आंगोळकर, मा.अर्चना बारणे यांचा प्रस्ताव –

वाल्हेकरवाडी चौक ते औंध रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतच्या ४५ मी. रूंद स्पाईन रस्ता विकसितकरणे व पवना नदीवर महानगरपालिका बोट कलब जवळ पुल बांधणे तसेच विकास आराखड्यातील फुगेवाडी पासुन ते चिंचवड पर्यंतचा रेल्वे लाईनला समांतर १२.०० मी. रूंदीचा रस्ता विकसीत करणेकामी नगरसदस्य, मा. आमदार यांची मागणी आहे. मे. स्तुप कन्सल्टंट प्रा. लि. यांनी महानगरपालिकेमधे उड्डाणपुल, नदीवरील पुल, रस्ता, इ. प्रकारचे अनेक प्रकल्पांचे नियोजन करून पुर्ण केले आहेत, त्यांचा कामाचा अनुभव पाहता त्यांचे महानगरपालिकेच्या कन्सल्टंट व आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणुक करण्यात यावी. तसेच वरील कामांसाठी मे.स्तुप कन्सलटंट प्रा. लि. यांची सल्लागार म्हणून नेमणूक केल्यास

कामे गुणवत्तेने पुर्ण होण्यास मदत होईल मा.स्थायी समिटी ठराव क्र.२१३९ दि. ०७/०२/२०१८ नुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना खालील प्रमाणे फी अदा करणेस मान्यता मिळाली आहे.

अ) रस्ते, पावसाळी वाहिनी आणि स्थापत्य विषयक प्रकल्प

| Sr. No. | Category | Pre Tender Fees | Post Tender Fees | Total Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | Upto 5 Crore | 0.75% | 1.25% | 2.00% |
| 2 | 5 to 20 Crore | 0.75% | 1.00% | 1.75% |
| 3 | 20 to 50 Crore | 0.50% | 1.00% | 1.50% |
| 4 | Above 50 Crore | 0.25% | 1.00% | 1.25% |

ब) उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, सबवे, रेल्वे उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, इमारत

| Sr. No. | Category | Pre Tender Fees | Post Tender Fees | Total Fees |
|---|---|---|---|---|
| 1 | Upto 5 Crore | 1.00% | 1.75% | 2.75% |
| 2 | 5 to 20 Crore | 1.00% | 1.50% | 2.50% |
| 3 | 20 to 50 Crore | 1.00% | 1.25% | 2.25% |
| 4 | Above 50 Crore | 0.75% | 1.25% | 2.00% |

वरील प्रमाणे मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या सल्लागार फी नुसार तसेच वरील तक्ता ब (उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, सबवे, रेल्वे उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, इमारत) मध्ये नमूद केलेल्या कामांकरीता डिझाईनचे प्रुफ चेकिंग (Proof Checking) साठी स्विकृत प्रकल्प रक्कमेच्या ०.५०% अशी फी सल्लागार देय राहिल, तरी वाल्हेकरवाडी चौक ते औंध रावेत रस्त्यावरील डेअरी फार्म चौक ताथवडे पर्यंतच्या ४५.०० मी. रूंद स्पाईन रस्ता विकसीत करणे तसेच विकास आराखड्यातील फुगेवाडी पासुन ते चिंचवड पर्यंतचा रेल्वे लाईनला समांतर १२.०० मी. रूंदीचा रस्ता विकसीत करणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. स्तुप कन्सलटंट प्रा. लि. यांची निविदा पुर्व व निविदा पश्चात कामासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच मनपाच्या सल्लागार पॅनलमध्ये समावेश करणेस व सदर या कामांसाठी मा. स्थायी समिती सभेने मान्यता दिल्यानुसार स्वीकृत निविदा रक्कमेच्या वरील तकत्यानुसार येणारी फी सल्लागारास अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच करारनामा करणेची कार्यवाही बीआरटीएस विभागा मार्फत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७३९ विषय क्रमांक – २९

दिनांक – ३०/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात या अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती गौरव प्रित्यार्थ समारंभासाठी यापुढे

प्रतिवर्षी र.रू.३,००,०००/- (अक्षरी र.रू. तीन लाख फक्त) महानगरपालिकेतर्फे कामगार कल्याण निधी मध्ये जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७४० विषय क्रमांक – ३०

दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे क्र.माध्य/शि/७/कावि/७१/२०१८, दि.२२/०५/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी माध्यमिक शिक्षण विभागामार्फत सन २०१५ - २०१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेल्या रूपीनगर, थेरगांव, लांडेवाडी, खराळवाडी, नेहरूनगर, फुगेवाडी/दापोडी या ६ उर्दू माध्यम शाळांना मा अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१७/प्र.क्र.६६८/एसएम-२ दिनांक २७/१०/२०१७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सदर शाळा स्वत:च्या उत्पनातून व राज्य शासनावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचे आर्थिक दायित्व न येता सुरु करण्यास शासन परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि, पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागातंर्गत कार्यरत असलेल्या ६ उर्दू माध्यम शाळांसाठी सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाकरिता घडयाळी तासिका बेसीसवर नेमलेल्या शिक्षकांची मुदत ही माहे एप्रिल २०१८ मध्ये संपुष्टात आल्याने सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता नव्याने जाहिरात देवून घडयाळी तासिका बेसीसवर शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक असल्याने सन २०१८/२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर नव्याने जाहिरात देवून ६ उर्दू माध्यम शाळाकरिता एकूण १२ शिक्षकांची नेमणूक करणेकामी व शासननिर्णयनुसार मानधनापोटी येणा-या अंदाजे खर्चास किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मा. स्थायी समिती सभेची मान्यता घेणेकामी दिनांक २७/०४/२०१८ अन्वये प्रस्तावास मान्यता घेण्यात आलेली आहे. सबब, सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षाकरिता वरील नमूद केलेल्या ६ उर्दू माध्यम शाळांकरिता बी.एस.सी. बी.एड. किंवा बी.ए. बी.एड. १२ शिक्षकांची घडयाळी तासिका बेसीसवर शिक्षकांची नव्याने जाहिरात देवून नेमणूक करणेस व शासन निर्णयानुसार घडयाळी प्रती तास र.रू.५४/- याप्रमाणे मानधन अदा करणे आवश्यक आहे. त्याकरिता माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रकामध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रू.४०,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तरी वरील नमूद केलेल्या ६ उर्दू माध्यमिक शाळांना १२ उर्दू माध्यम शिक्षकांची घडयाळी तासिका बेसीसवर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस व त्यांच्या मानधनापोटी येणा-या अंदाजे खर्चास किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२७४१ विषय क्रमांक – ३१
दिनांक – ३०/०५/२०१८ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.जनि/२/कावि/१०४७/२०१८, दि.२९/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त, यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.1-1-2018-19 (व्दितीय सुचना) अन्वये पिंपरी चिंचवड मनपाच्या "ह" प्रभागातील जलनिःसारण नलिकांची यांत्रिकी पध्दतीने वार्षिक साफसफाई करणे व चोकअप काढणेकामी M/s.Manish Associates यांनी नि.र.रू.98,97,048/- (अक्षरी र.रू.आठयाण्णव लाख सत्याण्णव हजार अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा 0.00 (अंदाजपत्रकीय दरानुसार) या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रकम रूपये 98,97,048/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अ / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४२ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ३०/०५/२०१८
सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

दि. २४/५/२०१८ रोजी स.१०.०० वा.प्रभाग क्र.२५ मधील विविध विकासकामांचे भुमिपुजन समारंभ महापालिकामार्फत आयोजित करणेत आले होते. सदर कार्यक्रम नियोजनाची माहिती सहा.आयुक्त, जनसंपर्क विभाग यांनी दि.२३/५/२०१८ रोजी सायं ५:४९:३३ वा महापालिका कार्यालयीन वेळ संपलेनंतर सर्व संबंधित सर्व विभागांना ई-मेल द्वारे कळविले. तसेच उदघाटनाची वेळ दि. २४/५/२०१८ रोजी कार्यालय सुरू होणे आगोदर म्हणजे स.१०.०० वा. आयोजित करणेत आले होते. तसेच या कार्यक्रमासाठी महापालिकेच्या पदाधिका-यांना तसेच संबंधित क्षेत्रिय कार्यालय अध्यक्ष तसेच त्या क्षेत्रीय कार्यालयातील सर्व सन्मा. नगरसदस्या यांनाही कोणत्या प्रकारचे ई-मेल, फोन, एस.एम.एस., व्हाईस एस.एम.एस., निमंत्रण पत्रिका इ. द्वारे कळविण्यात आलेले नाही. ही बाब नियमाधीन नाही सदर सहा.आयुक्त जनता संपर्क विभाग यांनी जाणुन बुजुन मनमानी करून शिष्टाचाराचा भंग केलेला आहे हे स्पष्ट होत आहे. सदर प्रकरणाची संपुर्ण चौकशी करून त्यांच्यावर जबाबदारी निस्चित करून योग्य ती कोयदेशीर कारवाई करणेत यावी. सदर बी.आर.टी.एस. चे कार्यकारी अभियंता यांनी ज्या कामाचे भुमिपुजन करणेत आले त्या कामामध्ये भुमिपुजन केलेला रोड या कामाचे वर्क ऑर्डर मध्ये अंर्तभाव आहे का? व कोणत्या मागणीवरून व कोणत्या बांधकाम व्यावसायिकाच्या फायद्यासाठी या रस्त्यावरील कामाची अंमलबजावणी केली आहे का? सदर कामाचे मार्च २०१६ मधील कामाचा आदेश असताना मे २०१८ मध्ये भुमिपुजन करणेचे काय प्रयोजन आहे. याचीही सदर कार्यकारी अभियंता, बी.आर.टी.एस. यांची संपुर्ण चौकशी करून

त्याच्यावरही प्रशासनाने त्वरीत कायदेशीर कारवाई करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ३०/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

सांगवी येथील महात्मा ज्योतीबा फुले पुलाच्या पिलरची एक बाजु प्रायोगिक तत्वावर व्हर्टिकल गार्डन म्हणुन विकसीत करणेचे काम मे.नेटसर्फ रिसर्च लॅब प्रा.लि., बाणेर, पुणे यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७४४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ३०/०५/२०१८

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.राजेंद्र गावडे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्र. २७०७ दि.२३/५/२०१८ मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

"प्रत्येक कामाचे अंतिम बील अदा करणेपुर्वी", **ऐवजी** "अंतिम बील अदा केलेनंतर त्वरीत लेखा परिक्षण विभागातून, लेखापरिक्षण करून घेणेत यावे". अशी दुरूस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/७३१/२०१८
दिनांक - ३१/०५/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## (क्र.स्था/नि/फ-मुख्य/कावि/२७५/२०१८, दि.१९/०५/२०१८ विषय क्र.१४ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ स्थापत्य फ मुख्यालय
क्र.स्था/नि/फ-मुख्य/२७५/२०१८
दि. १९/५/२०१८

प्रपत्र अ ( १ ते १७ )

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | १० |
| १ | बी.एम.पवार | ७३/४४/२०१७-१८ | सन २०१७-१८ साठी प्रभाग क्र.६१ येथील क्रिडा विषयक किरकोळ दुरुस्तीची व देखभालची कामे करणे. | ०७/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२५६/२०१८ | १८/०४/१८ | १८,००,००० | ३०.०६ | %कमी | १२५८९२० |
| २ | बी.एम.पवार | ७३/१७/२०१७-१८ | प्रभाग क्र. ६१ दापोडी बॉम्बे कॉलनी परिसरात नाला बांधणे | ०७/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२५५/२०१८ | १८/०४/१८ | १५,००,००० | ३०.०६ | %कमी | १०४९१०० |
| ३ | श्री साई कन्स्ट्रक्शन | ७३/२२/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील सातपुडा सोसायटीमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०९/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६४/२०१८ | १५/०५/१८ | ११,१५,४७२ | १०.०० | %कमी | १००३९२५ |
| ४ | अतुल व्ही मिसाळ | ७३/५७/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील गंगानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६६/२०१८ | १५/०५/१८ | ११,१५,५९९ | ११.०० | %कमी | ९९२८८३ |
| ५ | अतुल व्ही मिसाळ | ७३/३९/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी जयमालानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६५/२०१८ | १५/०५/१८ | ११,१३,८२२ | ११.०० | %कमी | ९९१३०२ |
| ६ | अतुल व्ही मिसाळ | ७३/३०/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील आनंदनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६३/२०१८ | १५/०५/१८ | ११,१४,८९८ | ११.०० | %कमी | ९९२२५९ |
| ७ | बहीरट ब्रदर्स | ७३/३५/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी परिसर विविध सेवा वाहिन्यांचे चर बुजविणे. | ०६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२५७/२०१८ | ०७/०५/१८ | ११,१७,६३६ | ९.१० | %कमी | १०१५९३१ |
| ८ | जी आर मंगोडेकर | ७३/५९/२०१७-१८ | प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर मधील एम आय डी सी जनरल ब्लॉक मध्ये आवश्यक ठिकाणी फुटपाथ कर्बींग करणे. (सन २०१७-१८) | ०६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२४९/२०१८ | १९/०३/१८ | १४,९९,४९६ | २७.१० | %कमी | १०९३१३३ |

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | सोपान जनार्दन घोडके | ७३/४/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील शितोळेनगर भागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | १६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२४७/२०१८ | १६/०३/१८ | ११,१२,३८७ | १२.०० | %कमी | ९७८९०१ |
| १० | पेव्हवे कन्स्ट्र प्रा लि | ७३/२८/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ स्वामी विवेकानंदनगर भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १६/०३/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६८/२०१८ | १५/०५/१८ | ११,२०,४०६ | १६.५० | %कमी | ९३५५३९ |
| ११ | देव कन्स्ट्रक्शन | ८/३९/२०१७-१८ | प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत मध्ये सेवा वाहिन्यांसाठी खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणे | ०६/०३/१८ | स्था/नि/इमु/१३७/२०१८ | २३/०४/१८ | १४,९९,९६६ | ३.७५ | %कमी | १४४३७१७ |
| १२ | श्री साईकृपा कन्स्ट्र | ७३/६३/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ नवी सांगवी परिसरामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७४/२०१८ | १५/०५/१८ | ११,१८,८५५ | १०.०१ | %कमी | १००६८५८ |
| १३ | प्रसाद बबन देवकर | ७३/४७/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ किर्तीनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७३/२०१८ | १५/०५/१८ | ११,१३,६८० | १०.१० | %कमी | १००११९८ |
| १४ | श्री साईकृपा कन्स्ट्र | ७३/४३/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ स्वामी विवेकानंदनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७२/२०१८ | १५/०५/१८ | ११,१४,४८५ | १०.२० | %कमी | १०००८०८ |
| १५ | श्री साईकृपा कन्स्ट्र | ७३/४८/२०१७-१८ | प्रभाग क्र.५८ संत तुकारामनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७१/२०१८ | १५/०५/१८ | ११,१२,८२२ | १०.०१ | %कमी | १००१४२९ |
| १६ | प्रसाद बबन देवकर | ७३/१०/२०१७-१८ | प्रभाग क्र.६० सांगवी पवारनगर, मुळानगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२७०/२०१८ | १५/०५/१८ | ११,१६,६३६ | १२.९९ | %कमी | ९७१५८५ |
| १७ | ए आर नायडू | ७३/१५/२०१७-१८ | प्रभाग क्र.५९ सांगवी मधील शितोळेनगर भागामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ०४/०५/१८ | स्था/नि/फ-मुख्य/२६९/२०१८ | १५/०५/१८ | ११,१५,४९३ | १०.१० | %कमी | १००२८२८ |
| | | | एकुण | | | | २,०८,०१,६५३/- | | | १,७४,४०,३९६/- |

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८